# मेट्रो- ३ खोदकामाच्या जागा काही महिन्यांतच होणार पूर्ववत

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो -३ प्रकल्पाच्या खोदकामासाठी टीबीएम यंत्रे उतरवण्यात आलेली ठिकाणे आणि स्थानकांच्या जागांचा पृष्ठभाग पूर्ववत करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे काही महिन्यांत ती ठिकाणे पूर्ववत होऊन वापरासाठी खुली झाल्यावर नागरिकांची गैरसोय दूर होईल. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने भुयारीकरणासाठी मुंबईतील अनेक जागा ताब्यात घेतल्या होत्या. त्या ठिकाणी मोठ्या विहिरी (शाफ्ट) खोदून टीबीएम (टनेल बोरिंग मशीन) उतरवण्यात आली आणि भुयारीकरणाची कामे सुरू झाली. आझाद मैदान, विधानभवन परिसर, माहीम, सिद्धिविनायक, कफ परेड आदी अनेक ठिकाणी ही कामे करण्यात आली. आता या ठिकाणी पृष्ठभाग पूर्ववत करण्याची कामे सुरू झाली आहेत. सिद्धिविनायक परिसरातील पुनर्भरण इतर ठिकाणांच्या तुलनेत वेगाने सुरू असून, जवळपास ६० टक्के काम झाले आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस परिसर आणि सारिपुत नगर येथील कामेही सुमारे ६० टक्के पूर्ण झाली आहेत. कफ परेड (२७ टक्के), विधानभवन परिसर (१५ टक्के), दादर (३५ टक्के), शितलादेवी (२५ टक्के), धारावी (६ टक्के), बीकेसी (३ टक्के), विद्यानगरी (३० टक्के) आणि सांताक्रूझ (५ टक्के) ही पुनर्भरणाची कामे प्रगतिपथावर आहेत.